**तापी नदी पात्रातील मौजे उप्परपींड -२ ता. शिरपूर, जि. धुळे, महाराष्ट्र राज्य या वाळू घाटाच्या (लगतचे गट नंबर 119,108,107,106 आणि 124) 6.00 हेक्टर क्षेत्रासाठी जन सुनावणी.**

- **<u>सारांश</u>**

**1. <u>परिचय :-</u>**


**तापी नदी पात्रातील मौजे उप्परपींड -२ ता. शिरपूर, जि. धुळे, महाराष्ट्र राज्य या वाळू घाटाच्या (लगतचे गट नंबर 119,108,107,106 आणि 124) 6.00 हेक्टर क्षेत्रासाठी पर्यावरण मंजूरी घेण्यात येते.**

❖ Integrated Precision Systems and Services Pvt Ltd, 6-3-841/A/2/C-1, Arun Aditya Building, Ameerpet, Hyderabad **यांना जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांचे मार्फत वाळू घाटांसाठी पर्यावरण मंजूरी प्राप्त करुन देण्याचे काम देण्यात आलेले आहे.**

भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, **औरंगाबाद यांचेकडून वाळू घाटाच्या खाणकाम आराखडयात मान्यता प्राप्त करुन घेण्यात येत आहे.**

**Form - 1 M, PFR, EMP, RA, DSR मधील अर्ज आणि वाळू घाटासाठी मंजूर खाणकाम आरखडा त्यासोबत पर्यावरण मंजुरीसाठी जन सुनावणीची कार्यवाही करण्यात येईल.**

**2 LOCATION MAP**



**तापी नदी पात्रातील मौजे उप्परपींड -२ ता. शिरपूर, जि. धुळे, महाराष्ट्र राज्य या वाळू घाटाच्या (लगतचे गट नंबर 119,108,107,106 आणि 124) 6.00 हेक्टर क्षेत्रासाठी जन सुनावणी.**

**3. उत्खननाची खाण :-**

**4.1 उत्खननाची पध्दत - ड्रिलींग आणि ब्लास्टिंग पध्दतीचा वापर न करता वाळू घाटातून वाळूचे उत्खनन करण्यात येईल. फक्त कुदळ, पावडी, घमेले यासारख्या साधनांचा वापर करुन मजूरांव्दारे कोरडया नदी पात्रातून वाळूचे उत्खनन करण्यात येईल.**

**4.2 यंत्रे / उपकरणे आवश्यक :- पावडी, घमेला, ट्रॉलीसह ट्रॅक्टर.**

**4.3 वाहतूक :- वाळूच्या जागेपासून डेपोसाठी निश्चित केलेल्या जागे पर्यत व ग्राहकांना ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे.**

**4.4 पुर्नभरण प्राप्तीकरण :- उघडे पडलेले क्षेत्र पावसाळयानंतर आपोआप पुन्हा भरले जाईल. नदीकाठ व वाहतुकीच्या रस्त्यालगत वृक्षारोपण केले जाईल.**

**4. <u>पर्यावरण व्यवस्थापन योजना</u>**

**5.1 वायू प्रदूषण नियंत्रण उपाय :-**

- **वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्या रोडवर वेळोवेळी पाणी शिंपडले जाईल.**
- **ट्रॅक्टर ट्रॉली व ट्रकवर ताडपत्री अच्छादूनच वाळूची वाहतूक टप्या-टप्याने केली जाते.**
- **वाहतुकीदरम्यान वाळूची गळती होणार नाही याची पुरेपुर काळजी घेण्यात येईल.**
- **नदीकाठी व वाळूच्या जागे जवळील मोकळया जागेवर वृक्षारोपण केले जाईल.**

**5.2 ध्वनी नियंत्रण उपाय :-**

- **उत्खनन व वाळू वाहतूक केवळ दिवसा केली जाईल.**
- **अल्प प्रमाणात ध्वनीप्रदुषण अपेक्षित असेल.**
- **गाडयांचा आवाज कमी करण्यासाठी वाळू वाहतूक करणा-या वाहनांची नियमित देखभाल केली जाईल.**
- **वाळू वाहतूक वाहनांच्या गती नियंत्रीत केल्या जातील.**

**5.3 जल प्रदूषण नियंत्रण उपाय :-**

- **वाळू उत्खनन केवळ कोरड्या नदीच्या पात्रातूनच केले जाईल.**
- **उत्खनन केलेल्या खड्डाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीपेक्षा वर ठेवली जाईल.**
- **नदीचा प्रवाह कृत्रीमरित्या वळविला जाणार नाहीत.**
- **नदी पात्रात वाहने धुण्यास मनाई राहील.**
- **उत्खननातून कोणत्याही सांडपण्याचा प्रवाह तयार होणार नाही.**
- **कामगारांसाठी फिरते शौचालयांची व्यवस्था राहील.**

**तापी नदी पात्रातील मौजे उप्परपींड -२ ता. शिरपूर, जि. धुळे, महाराष्ट्र राज्य या वाळू घाटाच्या (लगतचे गट नंबर 119,108,107,106 आणि 124) 6.00 हेक्टर क्षेत्रासाठी जन सुनावणी.**

- **पावसाळ्यात आणि पूरात उत्खनन टाळण्यात येईल. जेणे करुन नविन वाळूचा थर जमा होण्यास मदत होईल.**

**5.4 जमीन पर्यावरण :-**

- **कोरड्या नदीच्या पात्रात वाळू उत्खननामुळे तात्पुरते खड्डे तयार होतील, जे पावसाळयात पुन्हा भरुन येतील**
- **नदीच्या रूंदीच्या तीन मीटर किंवा रूंदीच्या 1/10 व्या जागेचे सुरक्षा अंतर नदीच्या काठापासून ("Sustainable sand mining guidelines") सोडले जाईल.**
- **पॉलिथीन पिशवी, जूट पिशवी इत्यादी कचरा नदीच्या पात्रात राहू/सांडण्याची परवानगी राहणार नाही.**
- **उत्खननास दिलेल्या परवानगी पेक्षा जास्त उत्खनन होणार नाही.**
- **नदीकाठी आणि जवळपास मोकळ्या जागेवर वृक्षारोपण केले जाईल.**

**G. हरित पट्टा निर्माण योजना :-**

| | |
|---|---|
| ग्रीनबेल्टची जागा | लीजच्या सीमेच्या दोन्ही बाजूंच्या आणि नदीकाठच्या बाहेर कच्या रोडच्या कडेला |
| वनीकरण क्षेत्र / वार्षिक | 300 वर्ग मीटर / वार्षिक |
| रोपांची संख्या | 150 रोपे |
| दोन रोपामधील अंतर | 2 मीटर |
| प्रजातींची निवड | चांगल्या प्रजातींची शिफारस केली जाईल. |

**वृक्षारोपणांसाठी चांगल्या प्रजातींची शिफारस :-**

| वृक्षाच्या जातीचे नाव | स्थानिक नाव | महत्व |
|---|---|---|
| आझादिरक्ता इंडिका | कडुलिंब | तेल उत्पादन |
| टेक्टोना ग्रँडिस | टीक | एंटीबैक्टीरियल, अँटीफंगल |
| फिकस रिलिओसिया | पिंपळ | औषधी उपयोग, फळे |
| बांबूसा वल्गारिस | बांबू | एन्थेलमिंटिक अँटी-इंफ्लेमेटरी, ॲस्ट्रिंजंट प्रॉपर्टीज |
| मधुका लाँगिफोलिया | महू | उत्तेजक आणि खोकल्यासाठी |

**तापी नदी पात्रातील मौजे उप्परपींड -२ ता. शिरपूर, जि. धुळे, महाराष्ट्र राज्य या वाळू घाटाच्या (लगतचे गट नंबर 119,108,107,106 आणि 124) 6.00 हेक्टर क्षेत्रासाठी जन सुनावणी.**

**6. <u>व्यावसायिक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापन :-</u>**

- **खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील.**
- **कान, डोळा आणि हाताचे संरक्षणाची साधने या व्यतिरिक्त सुरक्षा हेल्मेट आणि पादत्राणे दिली जातील.**
- **कामगारांना डस्ट मास्क दिले जातील.**
- **खाण कामगारांसाठी पिण्याच्या पाण्यासाठीची सोय करुन देण्यात येईल.**
- **खाण साइटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल.**

**7. निष्कर्ष :-**

- **धुळे जिल्ह्यात शिरपूर तहसील मधील प्रस्तावित मौजे उप्परपिंड - 2 हा वाळू घाट MoEFCC च्या मार्गदर्शक सूचनांनुसार बी 1 श्रेणीतील आहेत.**
- **उत्खननाच्या कमी प्रमाणामुळे पर्यावरणावर परिणाम होण्याची शक्यता नाही आणि त्यामुळे हे गावाच्या फायद्याचे ठरेल.**
- **प्रस्तावित प्रकल्प स्थानिक रहिवाशांना अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी प्रदान करेल.**
- **प्रस्तावित प्रकल्प सामाजिक पायाभूत सुविधा आणि या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासास सकारात्मक योगदान देईल.**
- **हवा, पाणी, आवाज, माती, घनकचरा व्यवस्थापन इ. सारख्या सर्व पर्यावरणीय प्रश्नांवर MoEF&CC मार्गदर्शक सूचनांनुसार कार्य केले जाईल.**